| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | १३/१०/२०१६ |
| नोंदणी दिनांक | - | १३/१०/२०१६ |
| पुनःनोंदणी दिनांक | - | ०७/०२/२०२२ |
| निकाल दिनांक | - | १३/०८/२०२६ |
| कालावधी | - | वर्षे महिने दिवस |
| | | ०९ १० ०० |

<u>अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वडगाव मावळ यांचे न्यायालयात.</u>

(पिठासीन अधिकारी - **डी. के. अनभुले**)

**विशेष खटला क्र.४४/२०२२**
**जुना विशेष खटला क्र.३७२/२०१६**
**निशाणी क्र. ३३**
**CNR No.MHPU290026352022**

भाग 'अ'

(पॅरा ४४(i) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल)

| **प्रथम खबरी अहवाल माहिती/गुन्हा आणि पोलीस स्टेशन** | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन<br>**देहु रोड** पोलीस स्टेशन, पुणे. |
| तपासी अधिकारी | **जे.बी. पाटील, सहा. पो.नि.**<br>गु.नों.क्र.१६७/२०१६ |
| अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता | अतिरिक्त सरकारी अभियोक्ता<br>**श्री. ओसवाल** |
| आरोपी | **रवि अशोक सिध्दप्पा,**<br>वय- ३३ वर्षे, धंदा- मजुर,<br>रा. विकास नगर, नेटके कॉलनी,<br>देहु रोड, पुणे. |
| आरोपी तर्फे | **श्री. टि.आय. जहागिरदार** वकील. |

भाग 'ब'

(पॅरा ४४(ii) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल)

| | |
|---|---|
| गुन्हा घडला तारीख | ११/०७/२०१६ |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | १२/०७/२०१६ |
| दोषारोपपत्र दिनांक | १३/१०/२०१६ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चीत दिनांक | १०/१०/२०१९ |
| पुरावा सुरुवात दिनांक | २८/०४/२०२६ |
| कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिताप्रमाणे आरोपीची जबानी नोंदविल्याचा दिनांक | १३/०८/२०२६ |
| युक्तीवादाची तारीख | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | ....... |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/०८/२०२६ |
| आरोपींच्या शिक्षेबाबतचा दिनांक | लागू नाही. |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप निश्चीतीचे कलम | दोषारोप निश्चीत दिनांक | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्या-पासून न्याय-निर्णया-पर्यंत आरोपी कारागृहात होता का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **रवि अशोक सिध्दप्पा** | १८/०७/२०१६ | न्यायाधीन बंदी | भारतीय दंड संहिताचे कलम ३६३, ३७६(आय) व 'बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२' (POCSO Act) च्या कलम ३ सह कलम ४ अन्वये | १०/१०/२०१९ | **दोषमुक्त केले.** | --- | --- |

भाग 'ब'

(पॅरा ४४(iii) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल)

(अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी)

| अभियोग पक्षातर्फे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
| सा.क्र.१ | पिडीतेची आई | २१ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | रोहिदास मांगेराम भुंबक | २३ | पंच साक्षीदार |
| सा.क्र.३ | पिडीता | २५ | पिडीता |

| आरोपींतर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
| १ | नाही | नाही. |

| न्यायालयातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
| १ | नाही | नाही. |

(अभियोग पक्षातर्फे/आरोपींतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्याची यादी)

'अ' - अभियोग पक्षातर्फे -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | २२ | फिर्याद |
| २. | २४ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | निशाणी क्र.३०/आरोपीतर्फे मान्य केलेला | पिडीतेचा वैद्यकीय अहवाल |

'ब' आरोपींतर्फे -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक |
|---|---|
| १ | नाही |

'क' न्यायालयातर्फे -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

'ड' महत्वाचे पुरावे -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**न्यायनिर्णय**
**(पारित दिनांक १३/०८/२०२६)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ३६३, ३७६(आय) व 'बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२' (POCSO Act) च्या कलम ३ सह कलम ४ अन्वये अभियोग चालविण्यात येत आहे.

**थोडक्यात अभियोग पक्षाची बाजू खालीलप्रमाणे आहेः-**

२. दि.११/०७/२०१६ रोजी फिर्यादी-पिडीतेची आई हिने घटनेची फिर्याद दिली. त्यानुसार दि.११/०७/२०१६ रोजी सकाळी ०७:०० वाजता ती शाळेत गेली होती. ती दुपारी १२:३० वाजता शाळेतून घरी आली. नंतर ०१:०० वाजता ती शिवणक्लासला महात्मा गांधी शाळेत, विकास नगर, येथे जाते असे सांगून ती गेली. दुपारी ०३३० वाजता घरी परत आली. नंतर ४ वाजता संध्याकाळी पिडीतेने सांगितले की, विकास नगर येथे जाते. असे सांगून पिडीता घरातून निघून गेली. ती परत घरी आली नाही. फिर्यादीने पिडीतेच्या मित्रमैत्रींकडे, नातेवाईकांकडे विचारपुस करुन शोध घेतला. तरीही पिडीता मिळून आली नाही. त्यानंतर तिची खात्री झाली की, तिला अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन पळवून नेले आहे. तशी फिर्याद नि.क्र.२२ ही गु.क्र.१६७/२०१६ भारतीय दंड संहिताचे कलम ३६३, ३७६(आय) व 'बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२' (POCSO Act) च्या कलम ३ सह कलम ४ नुसार गुन्हयाची नोंद केली. तपासाअंती वरील तरतुदींआधारे आरोपी विरुध्द दोषारोप दाखल केले.

३. दिनांक १०/१०/२०१९ रोजी निशाणी क्र.१३ वरील कलमांनुसार आरोप निश्चीती केली. त्यामधील मजकूर आरोपींना समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितल्याने न्याय चौकशीला सुरवात केली.

४. अभिलेखातील कागदपत्रे व नोंदी या आधारे न्यायालयाच्या समोर उपस्थित झालेले मुद्दे, त्या मुद्दयांवरील या न्यायालयाचे निष्कर्ष व त्या निष्कर्षांची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.११/०७/२०१६ रोजी दुपारी ०४:०० वाजणेच्या सुमारास फिर्यादीच्या एम.बी. कॉलनी, देहुरोड, पुणे येथील घरातून आरोपीने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचे (पिडीतेचे) तिच्या कायदेशीर संरक्षणातून अपहरण केले आणि याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३ अन्वये अपराध केला? | **.. नाही.** |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीवर (पिडीतेवर) बलात्कार केला आणि याद्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(आय) अन्वये अपराध केला? | **.. नाही.** |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादीच्या अल्पवयीन पीडित मुलीवर 'पेनिट्रेटिव्ह' (शरीरप्रवेशासह) लैंगिक अत्याचार केला आणि याद्वारे 'बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२' (POCSO Act) च्या कलम ३ सह कलम ४ अन्वये अपराध केला? | **.. नाही.** |
| ४. | काय आदेश? | **.. अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करिता</u> -**

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या पुराव्याप्रमाणे युक्तीवाद केला.

६. साक्षीदार क्र.३–पिडीता हिने नि.क्र.२५ तोंडी साक्षपुरावा दिलेला

आहे. तिच्या तोंडी साक्षीपुराव्यानुसार तिची जन्मतारीख ०८/०९/२००२ अशी आहे. घटनेच्या वेळी ती, तिची आई, वडील, भाऊ, बहीण इत्यादींसह रहात होती. रवी अशोक सिध्दप्पा यास ती ओळखत नाही. दि.०८/०६/२०१६ रोजी काय घडले ते तिला आठवत नाही. त्यावेळी ती खूप लहान होती.

७. साक्षीदार अभियोग पक्षाच्या साक्षीस सहाय्य करत नाही, म्हणून सरकारी वकिलांनी उलटतपासातील प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिल्यानंतर उलटतपास घेण्यात आला.

८. सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात तिने सांगितले की, दि.११/०७/२०१६ रोजी ती क्लासला जात होती. हे म्हणणे नाकबुल केले की, ती ०४.३० वाजता कामावर जात असताना घराच्या पाठीमागे रवी सिध्दप्पा याने तिला अडवून सांगितले की, त्याच्याकडे पैशे जमा झाले आहेत, आपण पळून जावून लग्न करु. हे म्हणणे नाकबुल केले की, त्याच्यासोबत ती त्याच्या विकास नगर, नेटके कॉलनी येथे घरी गेले. हे म्हणणे नाकबुल केले की, त्याची आई आणि भाऊ यांनी तिला समजावून सांगितले की, 'तू तुझ्या घरी परत जा'. हे म्हणणे नाकबुल केले की, रात्रभर तिने त्याच्या घरीच मुक्काम केला. हे म्हणणे नाकबुल केले की, त्या रात्री रवीने तिच्याशी जबरदस्तीने शारिरीक संबंध केले. हे म्हणणे नाकबुल केले की, दुस-या दिवशी दिनेश हेगडे याच्या घरी ती गेली. हे म्हणणे नाकबुल केले की, १४ तारखेला ते दोघे रेल्वेने ईश्वर हेगडे याच्या घरी ठाणे येथे गेले. हे म्हणणे नाकबुल केले की, दुस-या दिवशी ते दोघे व्ही.टी. ला गेले, तेथील देवीच्या मंदिरात जावून तिने आणि रवीने एकमेकांना हार घालून देवीच्या साक्षीने लग्न केले. हे म्हणणे नाकबुल केले की, त्यानंतर ती आणि रवी रेल्वेने बेंगलोरला गेले व त्याच्या बहिणीच्या घरी राहिले. हे म्हणणे कबुल केले की, त्यानंतर देहु रोड पोलीस व तिचे वडील त्या ठिकाणी आले व त्यांनी तिला इकडे परत आणले. तिच्या तपास टिपणातील लाल शाईने अधोरेखित केलेला मजकूर 'अ' हा तिने

पोलीसांना सांगितला नव्हता. तो त्यांनी का लिहिला याचे कारण ती सांगू शकत नाही.

९. साक्षीदार क्र.१ – पिडीतेची आई- फिर्यादी हिने नि.क्र.२१ वर तोंडी साक्षी पुरावा दिलेला आहे. तिच्या तोंडी साक्षीपुराव्यानुसार तिच्या मुलीचे-पीडीता हिचे जन्मवर्ष २००२ असे आहे. दि.११/०७/२०१६ रोजी पीडीता ही सकाळी ०७.०० वाजता महात्मा गांधी शाळेत गेली होती. दुपारी ०३.०० वाजता ती शाळेतून घरी आली. नंतर ती शिवण क्लासला शाळेतच गेली. परंतु ती परत आली नाही. तिचा आजूबाजूला शोध घेतला. परंतु ती मिळून आली नाही. म्हणून ती हरवली असल्याची तक्रार पोलीसात दिली. तिला दाखवलेली फिर्याद ही तिच आहे. त्यावर तिची सही आहे. पीडीता-तिच्या मुलीचा फोटो त्यावर आहे. त्यातील मजकूर खरा आणि बरोबर आहे. कर्नाटक येथे एक मुलगा याच्यासोबत पीडीता मिळून आली. त्या मुलाचे नाव रवी असे होते. त्याला व मुलीला तेथून येथे आणले. तिला फसवून तेथे घेवून गेल्याचे मुलीने नंतर त्यांना सांगितले होते. त्याला पाहिल्यावर ओळखू शकते.

१०. आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तिने सांगितले की, तिला मराठी येत नाही. फिर्यादीमध्ये काय लिहिले आहे हे तिला माहित नाही. पोलीसांनी तिला त्या इसमाचे नाव रवी असे सांगितले. मुलगी तिला पोलीस ठाण्यात भेटली. फिर्यादीने ती माहिती पोलीसांना दिली होती. हे म्हणणे नाकबुल केले की, सरतपासात सगळी माहिती चुकीची व खोटी सांगितली.

११. प्रकरणातील युक्तीवाद काळजीपुर्वक लक्षात घेतला. त्याचप्रमाणे साक्षीदारांच्या तोंडी साक्षीपुराव्याचेही काळजीपुर्वक बारकाईने अवलोकन केले. अभियोग पक्षाच्या बाजूप्रमाणे पिडीताचे वय वर्ष १५ होते. कामावर जात येत असतांना आरोपीने तिला त्याचा मोबाईल नंबर दिला. त्यावर ती तिच्याकडील मोबाईलवरुन त्याच्याशी बोलत असायची. आरोपीने तिला सांगितले की, त्याच्याकडे पैसे जमा झाले असून आपण पळुन जावून लग्न करुन. त्यावर तिने

होकार दिला. त्याच्यासोबत त्याच्या घरी विकास नगर येथे गेली. त्यानंतर ते दोघे वेगवेगळया ठिकाणी गेले व राहिले. दि-१८/०७/२०१६ रोजी संध्याकाळी पोलीसांनी त्यांना बेंगलोरला ताब्यात घेतले. जवळजवळ एक ते सव्वा महिने पिडीता ही आरोपी सोबत होती. अभियोग पक्षाच्या म्हणण्यानुसार आरोपीची आई व भाऊ यांनी तिला समाजावून सांगितले की, तू तुझ्या घरी परत जा तरीही ती आरोपीसोबत राहिली. ती त्याच्यासोबत दुस-यादिवशी शितळानगर येथे आरोपीच्या मित्राच्या घरी राहिली. तेथून ते दोघे ठाणे येथे आरोपीच्या मित्राच्या घरी गेले. तेथून त्यांनी व्ही.टी. येथील देवीच्या मंदीरात लग्न केले. त्या दोघांनी एकमेकांना हार घालून देवीच्या साक्षीने लग्न केले. त्यानंतर ते बेंगलोरला गेले. अशी अभियोग पक्षाची स्वतःची बाजू आहे. पिडीता ही १५ वर्षांची असल्याने समजदार झाली होती. ब-यावाईटाची तिला जाणीव होती. आरोपीशी ओळख झाली व ओळखीतून तिने त्याला लग्नाला होकार दिला व त्यासोबत निघून गेली. एक ते सव्वा महिने ते सोबत राहिले. या दरम्यान अनेक ठिकाणी अनेक लोकांशी तिचा संपर्क आला होता. तिने एकदाही एकाही ठिकाणी, एकाही व्यक्तीला सांगितले नाही की, आरोपीने तिला जबरदस्तीने पळून नेले आहे, त्याने जबरदस्तीने तिच्याशी शरीरसंबंध केले आहेत. असे सांगून पोलीसांची मदत घेण्याचा एकदाही प्रयत्न केला नाही. यावरुन ती तिच्या स्वतःच्या मर्जीने, राजीखुशीने, त्यासोबत गेली व राहिली असल्याचे दिसून येते. मुंबई उच्च न्यायालयाचे वेगवेगळया अनेक न्यायनिर्णयानुसार अशाप्रकरणात बलात्कार किंवा बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्याची कलम लागत नाहीत. याशिवाय, पिडीतेने अभियोग पक्षाची वरील प्रमाणे सूचक विधाने उलटतपासात पूर्णपणे नाकारलेली आहेत. त्यामुळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द केलेला नाही. **म्हणून वरील सर्व मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले**.

१२. वरील सर्व कारणांमुळे आरोपीची निर्दोष मुक्तता होणे तर्काला व न्यायाला धरुन आहे.

१३. मुद्देमाल मिळकत मायक्रो एसडी कार्ड यामध्ये पिडीतेचे वैयक्तीक स्वातंत्र्याचे संकोच करणारे मटेरियल असल्याने अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नाश करुन त्याची विल्हेवाट संगणक लिपीकाच्या समक्ष नियमाप्रमाणे करावी. तसा संगणक लिपीकाचा अहवाल मिळकत नाश केल्याबददल घ्यावा व जतन करुन या प्रकरणाात ठेवावा.

१४. सबब, हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे-**रवि अशोक सिध्दप्पा** याला भारतीय दंड संहिताचे कलम ३६३, ३७६(आय) व 'बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२' (POCSO Act) च्या कलम ३ सह कलम ४ अन्वये आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीना तात्काळ मुक्त करावे असे पत्र अधिक्षक, येरवडा कारागृह यांना ई-मेलने तातडीने आजच्या आज पाठवावे. तसेच सर्वसाधारण पध्दतीने म्हणजे पत्राने सुध्दा कळवावे.
अधिक्षक, येरवडा कारागृह यांनी आरोपीना तुरुंगातून मुक्त केल्याचा कारवाई अहवाल आजच्या आज ई-मेलने न्यायालयात दाखल करावा.

३. मुद्देमाल मिळकत मायक्रो एसडी कार्ड यामध्ये पिडीतेचे वैयक्तीक स्वातंत्र्याचे संकोच करणारे मटेरियल असल्याने अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नाश करुन त्याची विल्हेवाट संगणक लिपीकाच्या समक्ष नियमाप्रमाणे करावी. तसा संगणक लिपीकाचा अहवाल मिळकत नाश केल्याबददल घ्यावा व जतन करुन या प्रकरणात ठेवावा.

४. यदाकदाचित अपील झाल्यास अपील न्यायालयात हजर राहण्यासाठी आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु.५०,०००/- चा जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा एक लायक जामीनदार आजपासून सात दिवसांच्या आत न्यायालयात दयावा.

DATTATREYA KASHINATH ANBHULE

Digitally signed by DATTATREYA KASHINATH ANBHULE
Date: 2026.08.13 14:01:52 +0530

(डी. के. अनभुले)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
वडगाव मावळ, जि. पुणे.

दिनांक – १३/०८/२०२६

“I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of the Steno : Shri. K.S. Chavan,
Stenographer (Grade I)

Court Name : Shri. D.K. Anbhule,
Additional Sessions Judge,
Vadgaon Maval, Dist-Pune.

Date : 13/08/2026

Judgment signed by presiding officer on : 13/08/2026

Judgment uploaded on : 13/08/2026